कोषागारातून रोख देय अनुदान राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याबाबत. सहाय्यीकृत बाबी, पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण लेखाशीर्ष-२२१५ ९७९१(सर्वसाधारण)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र.राग्रापे-२०१७/प्र.क्र.१२१/पा.पु.१०
जी.टी. हॉस्पीटल इमारत, ७ वा मजला,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०६.१०.२०१७

शासन निर्णय-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून दिनांक २८.०४.२०१७ च्या आदेशान्वये पाणी गुणवत्ता व संनियंत्रण (WQMS) यासाठी रु.५.८९१५ कोटी व दिनांक ०३.०८.२०१७ च्या आदेशान्वये सहाय्यीकृत बाबी (Support) यासाठी रु.११.१२७५ कोटी एवढी केंद्र हिश्श्याची रक्कम प्राप्त झाली आहे.

२. केंद्र शासनाकडून वरील घटकांसाठी प्राप्त झालेली एकूण रु. १७.०१९० कोटी एवढी रक्कम आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम रु. १७.०१९० कोटी (रुपये सतरा कोटी एक लक्ष नव्वद हजार मात्र) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा) (श्री. का. जा. धलपे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव (श्री. य. टे. पाडवी), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा) (श्री. का. जा. धलपे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करुन ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी व तद्नंतर स्वतंत्र धनादेशाद्वारे सदर रक्कम पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी. पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर रक्कम केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच राज्य शासनाने या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार खर्च करावी.

३. यावर होणारा खर्च मागणी क्र. वाय-०२, लेखाशिर्ष-२२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१, पाणी पुरवठा, १०२, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, ०२, जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदान, (०२) (०२५), राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (केंद्र हिस्सा) यासाठी अनुदाने, ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२१५ ९७९१) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर प्रकरणी वित्त विभाग, परिपत्रक दिनांक १८.०४.२०१७ मधील अनु.क्र.७ ते १८ येथील अटींची तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील बाबींची पुर्तता होत आहे. उपरोक्त रु. १७.०१९० कोटी एवढा केंद्र निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाल्याबद्दलची खात्री वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेकडून करण्यात आली आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१७१००६१४५५२६१९२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prabhakar Laxman Chakre

Digitally signed by Prabhakar Laxman Chakre
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fb55c284fefe73988e693f9b35dc7d7550dd83ea4655d9b78cccfa4d9d2f67eb, cn=Prabhakar Laxman Chakre
Date: 2017.10.07 11:25:52 +05'30'

(प्र. ल. चक्रे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
२. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
४. नियोजन विभाग, कार्यासन-१४४३, मंत्रालय, मुंबई.
५. वित्त विभाग, व्यय-३, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
७. आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव, (रोख शाखा), पाणी पुरवठा व
८. स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासने क्र. पा.पु.०४, पा.पु.२०,
१०. निवडनस्ती पापु-१० कार्यासन.